22.5.2023
आ.क्र.

# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

दिनांक : २२/०५/२०२३

## प्रसिध्दी पत्रक (प्रेसनोट)

आज सोमवार दिनांक २२/०५/२०२३ रोजी मा. आयुक्त श्री. अजीज शेख यांच्या आदेशान्वये व मा. अतिरीक्त आयुक्त (शहर) श्री. जमीर लेंगरेकर व मा. उप-आयुक्त (आरोग्य) डॉ. सुभाष जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छ भारत अभियान अंतर्गत “मेरी लाईफ मेरा स्वच्छ शहर” मोहिमे नुसार उल्हासनगर महानगरपालिकेच्या **“RRR CENTER” (Reduse Reuse Recycle)** केंद्राची स्थापना बोटक्लब, हिराघाट उल्हासनगर – 03 करण्यात आलेली आहे. सदर **“RRR CENTER” (Reduse Reuse Recycle)** केंद्राचे मा. आयुक्त श्री. अजीज शेख व मा. अतिरीक्त आयुक्त (शहर) श्री. जमीर लेंगरेकर व यांच्या शुभ हस्ते दुपारी ०१:०० वाजता उद्‌घाटन करण्यात आले. तसेच उल्हासनगर महानगरपालिका व आर.के. तलरेजा महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने “आर. के. तलरेजा महाविद्यालय, उल्हासनगर - ३” येथे सुध्दा **“RRR CENTER” (Reduse Reuse Recycle)** केंद्राची स्थापना करण्यात आली असुन दुपारी ०३:०० वाजता सदर केंद्राचे उद्‌घाटन मा. अतिरीक्त आयुक्त (शहर) श्री. जमीर लेंगरेकर सर व आर. के. तलरेजा महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. गीता मेनन मॅडम यांच्या शुभ हस्ते करण्यात आले आहे.

स्वच्छ भारत अभियान अंतर्गत “मेरी लाईफ मेरा स्वच्छ शहर” मोहिमे नुसार **“RRR CENTER” (Reduse Reuse Recycle)** या मोहिमेबाबत मा. आयुक्त श्री. अजीज शेख यांनी शहरातील नागरीकांना आपल्या घरातील उपयोगात नसलेली जुनी कपडे, वह्या, जुनी पुस्तके, जुनी खेळणी, वापरात नसलेले चप्पल / बुट, स्वच्छ प्लास्टीक वस्तु, वापरात नसलेली भांडी, ईलेक्ट्रॉनिक वस्तु, इ. वस्तु सदर केंद्राच्या ठिकाणी जमा करण्याबाबत आवाहन केले आहे. सदर केंद्रावरील वस्तु ह्या गरजु नागरीकांना देण्यात येतील. व ज्या वस्तु वापरण्यायोग्य नसतील अश्या सर्व वस्तुंचे **“RRR” (Reduse Reuse Recycle)** नुसार कार्यवाही करण्यात येईल.

सदर उपक्रमास मा. आयुक्त श्री. अजीज शेख सर मा. अतिरिक्त आयुक्त (शहर) श्री जमीर लेंगरेकर, मा. सहाय्यक सार्वजनिक आरोग्य अधिकारी श्री. मनीष हिवरे, मा. मुख्य स्वच्छता निरीक्षक श्री विनोद केणे व श्री एकनाथ पवार तसेच सर्व स्वछता निरीक्षक, सिटी कोऑर्डिनटोर, वृक्ष फाऊंडेशन च्या ज्योती तायडे व त्यांच्या महिला कर्मचारी उपस्थित होते.

22/5/23

(छाया प्रकाश डांगळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत –माहितीस्तव सादर.
मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.
१. पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२. सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका